॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १३ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

**✻ सुविचार ✻**

गरूडाइतके उंच उडता येत नाही, म्हणून चिमणी कधी उडण्याचे सोडत नाही.

## SPOT NEWS

### महिला व ज्येष्ठांना एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक

● **मुंबई** – राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला आहे. आतापर्यंत राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल.

### बँकांमधील ठेवी घटल्याने बँका संकटात

● **नवी दिल्ली** – उद्योग, कंपन्या आणि अन्य क्षेत्रांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत असताना बँकांमधील ठेवींमध्ये घट झाली आहे. त्यामुळे बँकिंग व्यवस्थेतील निधीवरील ताण वाढला असून कर्ज आणि ठेवी यांच्यातील तफावत अवघ्या दोन महिन्यांत ३.८ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. ३१ मे २०२६ रोजी संपलेल्या पंधरवड्यात बँकांच्या कर्जवाढीचा दर १७.७ टक्क्यांवर पोहोचला. चालू आर्थिक वर्षातील हा आतापर्यंतचा सर्वोच्च दर असून जून २०२४ नंतरची ही सर्वाधिक वार्षिक वाढ आहे. ३१ मार्च २०२६ पासून बँकांनी दिलेल्या कर्जात १.५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली असून देशातील एकूण कर्जरक्कम २१५.२ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर

# पात्र शेतकऱ्यांनी 'आधार'शी मोबाईल क्रमांक लिंक करावा

### पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती । नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

राज्यातील शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. सर्व पात्र शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने आधार क्रमांक उपलब्ध करून घ्यावा तसेच आधार क्रमांकाशी चालू भ्रमणध्वनी क्रमांक संलग्न (लिंक) करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे यांनी केले आहे.




राज्यातील नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट व इतर कारणांमुळे अनेक शेतकऱ्यांना पीक कर्जाची वेळेत परतफेड करणे शक्य झाले नाही. त्यामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याची बाब लक्षात घेऊन शासनाने पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.

या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित करण्यात आलेल्या अल्पमुदत पीक कर्जांचा विचार करण्यात येणार असून, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे पात्र ठरणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांनी 'एकरकमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते शासनाच्या कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी पात्र ठरतील. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

शासनाने आर्थिक शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष तरतूद केली असून, सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण तसेच ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य राहणार आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून, शासनामार्फत याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील.

आधार क्रमांक, बँक खात्यांची माहिती किंवा ऑनलाइन नोंदणी अपूर्ण असल्यामुळे अनेक पात्र शेतकरी विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आपले आधार क्रमांक, बँक खाते, भ्रमणध्वनी क्रमांक व जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद अद्ययावत करून ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इराण-अमेरिकेत १४ कलमी करार!

● **तेहरान** –

मागील काही महिन्यांपासून अमेरिका आणि इराणमध्ये तणाव सुरू आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्यामुळे याचा परिणाम जागतिक व्यापारावर झाला आहे. त्यातच आता अमेरिका आणि इराणमध्ये करार झाल्याचे समोर आले असून, त्यानुसार होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार असल्याचे समजते. अमेरिका आणि इराण यांच्यात १४ कलमी करार झाला असून, या दोन्ही देशांतील प्रस्तावित शांतता कराराच्या अटी उघड झाल्या आहेत. इराणच्या निमसरकारी मेहेर वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार मसुदा करारात १४ महत्त्वाची मुद्दे आहेत. त्यातील पहिला मुद्दा लेबनॉनमधील सुरू असलेल्या संघर्षासह सर्व आघाड्यांवरील शत्रुत्व तात्काळ कायमस्वरुपी संपुष्टात आणणे हा आहे.

या करारानुसार होर्मुझची सामुद्रधुनी ३० दिवसांच्या आत पुन्हा उघडण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, तिचे कामकाज इराणच्या देखरेखीखाली असमार आहे. मसुद्यानुसार अमेरिका इराणच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही आमि त्यांच्या सार्वभौमत्वाचा आदर करेल. इतकेच नव्हे तर अमेरिकेला ३० दिवसांच्या आत नौदल नाकेबंदी उठवावी लागेल आणि इराणच्या आसपासाची आपली लष्करी उपस्थिती कमी करावी लागणार आहे. या अटींना इराण किंवा अमेरिकेकडून अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. अहवालानुसार कराराचा मसुदा अद्याप अंतिम झालेला नाही आणि तो इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

करारावर स्वाक्षरी झाल्यावर लेबनॉनसह सर्व आघाड्यांवर ६० दिवसांची युद्धबंदी सुरू होईल. होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाईल आणि त्यातून जाणा-या जहाजांकडून इराण कोणतेही शुल्क आकारणार नाही. करार झाल्यानंतर ३० दिवसांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक युद्धपूर्व पातळीवर परत येईल. इराणच्या बंदरांवरील अमेरिकेची नाकेबंदी उठवली जाईल आणि तेहरानला निर्बंधांमध्ये सूट मिळेल. या करारानुसार इराण भविष्यात अण्वस्त्रे मिळवणार नाही, असे वचन आणि हमी देईल. या अमेरिका-इराण कराराला इस्लामाबाद करार म्हटले जाईल, कारण पाकिस्तान यात मध्यस्थ आहे असं सांगण्यात आले आहे.

## किशोर परभणे मारहाण प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाने शरद खंडू पवार यांना जामीन फेटाळला

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

किशोर महादेव परभणे यांना अमानूष मारहाण केल्याच्या कारणामुळे न्यायालयीन कोठडीत असलेले खासदार निलेश लंके यांचे कट्टर समर्थक चिंचोडी पाटीलचे सरपंच शरद खंडू पवार याचा जामिन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने आज फेटाळला आहे.



सोशल मिडीयावर व्हीडीओ पोस्ट केल्याचे कारणाने किशोर महादेव परभणे यांचे अपहरण करुन, त्यांना खोलीत डांबून ठेवत अमानुष मारहाण केल्याची घटना घडली होती. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रणव विजय मोरे, शदर खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे यांच्यावर ४ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्याबाबत सोशल मिडीयावर व्हीडीओ पोष्ट केल्याच्या रागातून अपहरण आणि मारहाणीची घटना घडली होती.

या घटने संदर्भात पोलिसांनी शरद खंडू पवार यास अटक केली होती. अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री एस आर शिंदे यांच्या न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती. पवार हा कोठडीत असताना तपासी अधिकाऱ्यांना उडवा उडवीचे उत्तर देत समाधानकारक माहीती न दिल्याने पोलिसांनी त्यास पुन्हा न्यायालयात हजर केले होते. न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली. जामीन मिळावा म्हणून, शरद खंडू पवार याने न्यायालयात प्रयत्न यापुर्वी केले होते.

याबाबतची सुनावणी शुक्रवारी पुन्हा जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश राजेश गुप्ता यांच्यासमोर झाली. मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड.आनंद व्यवहारे यांनी बाजू मांडली तर, सरकार पक्षाच्या वतीने अतिरीक्त सरकारी वकील अनिल ढगे यांनी बाजू मांडून शरद पवार यांच्या जामीण अर्जास विरोध केला. न्यायालयाने दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर शरद खंडू पवार याचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

# पाथर्डीतील जुन्या बसस्थानक परिसरात खचलेल्या गटारात 'शिवाई' बस अडकली

### ४० प्रवासी थोडक्यात बचावले । रस्ते व गटारांच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष; राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाविरोधात संताप

● **पाथर्डी । वीरभूमी** –

राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या कथित निष्काळजीपणा आणि निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे पाथर्डी शहरातील जुन्या बसस्थानक परिसरात मोठी दुर्घटना टळल्याची घटना घडली. पुणे-बीड मार्गावरील प्रवासी वाहतूक करणारी 'शिवाई' बस जुन्या बसस्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळील खचलेल्या व तुटलेल्या गटारात अडकली. बसचे एक चाक पूर्णपणे गटारात गेल्याने वाहन एका बाजूला झुकले. सुदैवाने बसमधील सुमारे ४० प्रवासी सुरक्षित राहिले आणि मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याहून बीडकडे निघालेली 'शिवाई' बस पाथर्डी येथील जुन्या बसस्थानक परिसरातून बाहेर पडत असताना खचलेल्या गटाराचा अंदाज न आल्याने बसचे पुढील चाक गटारात अडकले. त्यामुळे बस एका बाजूला झुकली. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. बसमधील प्रवाशांनी तत्काळ खाली उतरून स्वतः चा बचाव केला. या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला.

स्थानिक नागरिक, प्रवासी आणि एसटी कर्मचाऱ्यांनी या प्रकाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. संबंधित ठिकाणी गेल्या दोन वर्षांपासून रस्त्यांची दुरवस्था, खचलेली गटारे आणि धोकादायक परिस्थिती याबाबत सातत्याने तक्रारी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे अखेर ही घटना घडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर दररोज शेकडो नागरिक प्रवास करतात. बसस्थानक परिसरातील रस्ते आणि गटारांची अवस्था अत्यंत खराब असून त्यामुळे कायम अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यापूर्वीही अनेक किरकोळ अपघात घडले असून, प्रशासनाने वेळेत दुरुस्तीची कामे केली असती तर ही परिस्थिती उद्भवली नसती, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या घटनेनंतर संतप्त प्रवासी, नागरिक आणि एसटी कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या कारभाराचा निषेध करत तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित ठिकाणाची त्वरित पाहणी करून रस्ता व गटारांची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



SPOT NEWS

## पै. नाना डोंगरे यांना अल्बोस टेक्नॉलॉजीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना महाराष्ट्र भूषण २०२६ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे दि. २० जून रोजी होणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, आशू सुरपूर, संदिप रासकर आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.

## खांबळी पाझर तलावातील पाणी चोरीप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

खांबळी पाझर तलावातील कथित पाणी चोरी व वीज चोरीप्रकरणी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना प्रतीकात्मक स्वरूपात 'राष्ट्रीय भ्रष्टोबा' घोषित करून त्यांच्या निषेधार्थ दोन दगडांना शेंडी-शेंदूर लावण्यात आला. तसेच त्यांच्या डोक्यात प्रकाश पडावा आणि जनतेच्या समस्या समजाव्यात यासाठी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाचे प्रतिकात्मक प्रतिमा अर्पण करण्यात आले. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, रवी सातपुते, शंकर साळवे, तुकाराम बोरगे, पोपट भोसले, शाहीर कान्हू सुंबे, ड. अमित थोरात, बाळासाहेब पालवे, वीरबहादूर प्रजापती, वाय. के. शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. मौजे पळशी (ता. पारनेर) येथील खांबळी पाझर तलावासाठी महाराष्ट्र शासनाने १९८६ साली जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यानंतर तलावाचे काम सुरू होऊन १९९० मध्ये तलाव पूर्णत्वास गेला. मात्र, तलाव परिसरातील काही व्यक्तींनी शासनाची परवानगी न घेता तलावाच्या हद्दीत बेकायदेशीरपणे विहिरी खोदल्या असल्याचा आरोप करण्यात आला.

# गटेवाडीत ग्रामपंचायतीकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**शैक्षणिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान । माजी सैनिकांचाही गौरव**

**● पारनेर । वीरभूमी –**

गटेवाडी (ता. पारनेर) ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. यावेळी बायफ संस्थेमार्फत गावात राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. गावच्या माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्या कविता राजेंद्र गट यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुपा पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार सुनील कुटे, तालुका दूध संघाचे माजी व्यवस्थापक ज्ञानदेव गट, विद्यमान सरपंच मंगल गट, उपसरपंच किरण गट, सेवा सोसायटीचे अध्यक्ष संजय पवार, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष संदीप गट (मेजर) तसेच बायफ संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या सोहळ्यात इयत्ता पाचवी व आठवीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेले विद्यार्थी, राज्य बास्केटबॉल संघात निवड झालेला सोहम गट तसेच राज्य राखीव पोलीस दलात निवड झालेला रोहन गट यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याशिवाय शासकीय सेवेतून निवृत्त झालेले रमेश गट यांचाही सन्मान करण्यात आला.

बायफ संस्था आणि आयटीसी मिशन सुनहरा कल यांच्या कार्याबद्दल त्यांना कृतज्ञता प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच गावातील माजी सैनिकांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

सरपंच मंगल चंद्रकांत गट यांनी आपल्या भाषणात गावातील विकासकामांचा आढावा घेताना, माझं गाव बदलतंय, याचा मला अभिमान आहे, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या. प्रमुख पाहुणे सुनील कुटे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना, तुमच्या रूपाने उद्याचे भावी अधिकारी घडत आहेत, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय पवार यांनी केले, सूत्रसंचालन शिक्षक नेते चंद्रकांत गट यांनी केले, तर आभार तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष संदीप गट (मेजर) यांनी मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, माजी सैनिक, ग्रामस्थ, महिला भगिनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पाच वर्षांत गावात विकासाची गंगा

■ गेल्या पाच वर्षांत सरपंच मंगल चंद्रकांत गट यांच्या नेतृत्वाखाली गावात रस्ते, सभामंडप, जलसंधारण आणि समाजमंदिर यांसारख्या विविध विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, त्यामुळे गावात विकासाची गंगा पोहोचली आहे. भौतिक विकासाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. अशा प्रकारचे सन्मान सोहळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत तालुका दूध संघाचे माजी व्यवस्थापक ज्ञानदेव बाबासाहेब गट यांनी व्यक्त केले.

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगावला अभियांत्रिकी प्रवेशासाठी सुविधा केंद्र सुरु

**● अकोले । वीरभूमी–**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दहावीनंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा इंजिनिअरिंग) तसेच बारावी विज्ञान शाखेनंतर द्वितीय वर्ष डिप्लोमा अभियांत्रिकी प्रवेशासाठी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगाव यास नवीन सुविधा केंद्र (FC-५६६२) म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

जून २०२६ पासून पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून, ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी तंत्र शिक्षण विभागामार्फत poly26.dtemaharashtra.gov.in हे पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या अनुषंगाने पदविका प्रवेशासाठी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगाव या तंत्रनिकेतन महाविद्यालयास सुविधा केंद्र (FC-५६६२) मंजूर करण्यात आले आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांना दर्जेदार, करिअर व रोजगाराभिमुख तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी तसेच पदविका अभ्यासक्रमांमधील प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हे सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या सुविधा केंद्राचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा आणि आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालिका सौ. सुप्रिया वाकचौरे, सौ. गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, सौ. प्रतीक्षा रहाणे, को-ऑर्डिनेटर प्रा. विद्याचंद्र सातपुते, सुविधा केंद्राच्या समन्वयक प्रा. प्राजक्ता आंबरे-सावंत (FC-५६६२), प्राचार्य विनोद गिरी तसेच सर्व प्राध्यापकांनी केले आहे.

## बालाजी नगरमधील उच्च दाबाची वीजवाहिनी हटवा

**दुर्घटनेपूर्वी प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणी । अन्यथा आंदोलन**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा शहरातील बालाजी नगर परिसरातून जाणारी उच्च दाबाची वीजवाहिनी नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरत असल्याने ती तात्काळ हटवून पर्यायी सुरक्षित व्यवस्था करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



नागरिकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, व्यंकटेश विहार इमारत ते डॉ. कपिल यांच्या घरापर्यंत उच्च दाबाची वीजवाहिनी गेलेली असून ती अत्यंत दाट लोकवस्ती आणि घरांना लागून असल्यामुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. परिसरात महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या भीतीच्या वातावरणात राहत आहेत.

वादळी वारे, पावसाळा किंवा तांत्रिक बिघाड झाल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने पाहणी करून ही वीजवाहिनी हटवावी व पर्यायी सुरक्षित व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. निवेदनाच्या प्रती नागरिकांच्या वतीने राजेंद्र कुटे, अभिषेक उदमले, राजेंद्र भगत यांनी प्रशासनाला दिल्या.

याबाबत तहसीलदार, अधीक्षक अभियंता कर्जत विभाग, श्रीगोंदा नगरपालिका, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी अहिल्यानगर तसेच राज्याचे ऊर्जामंत्री यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या मागणीला परिसरातील शेकडो नागरिकांचा पाठिंबा मिळत असून प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कर्जमाफीच्या अटी व देवस्थान जमीनप्रश्नी किसान सभेचे कृषिमंत्री यांच्याकडे आक्षेप

**प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याचे कृषिमंत्र्यांचे आश्वासन । मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा**

**● पुणे, अकोले । वीरभूमी –**

कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात, देवस्थान जमीन कायदा करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, पीक विम्यातील रद्द केलेले ट्रिगर पुन्हा लागू करावेत तसेच पेसा मोबिलायझर पदे कमी करण्याचा निर्णय मागे घ्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी किसान सभेच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली. या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन कृषिमंत्र्यांनी दिले.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेत अनेक जाचक अटी घातल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याचा आरोप किसान सभेने केला. या अटी रद्द करून शेतकऱ्यांचा सातबारा खऱ्या अर्थाने कोरा करावा, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

किसान सभेने काढलेल्या लाँग मार्चदरम्यान देवस्थान जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना त्या जमिनीची मालकी देण्यासाठी कायदा करण्याचे मान्य करण्यात आले होते. त्यानुसार राज्य सरकारने कायद्याचा मसुदा प्रसिद्ध करून हरकती मागविण्याची प्रक्रिया सुरू केली होती. मात्र, काही संघटनांच्या दबावामुळे हा प्रस्ताव स्थगित करण्यात आल्याने शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. शेतकरी हिताचे बदल करून हा कायदा मंजूर करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

सन २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या आणि यंदा पुन्हा पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठीही उर्वरित कर्ज पूर्णपणे फेडण्याची अट घालण्यात आली आहे. राज्यात अशा शेतकऱ्यांची संख्या सुमारे १२ लाख ७१ हजार असल्याचे किसान सभेने नमूद केले. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या २३ लाख ७३ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

राज्य सरकार ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याचा दावा करत असले, तरी अटी व शर्तींमुळे प्रत्यक्षात फार कमी शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार असल्याचे किसान सभेचे म्हणणे आहे. २०२५ मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाईही योग्य प्रकारे मिळाली नसल्याने सरकारने या अटींचा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली.

पीक कर्जाबरोबरच शेती अवजारे, सिंचन सुविधा, कुक्कुटपालन, इमूपालन, पॉलिहाऊस यांसाठी घेतलेल्या कर्जाचा समावेश कर्जमाफी योजनेत करावा, तसेच सोनेतारण व मायक्रोफायनान्स कर्जही माफ करावे, अशी मागणी किसान सभेने केली. याशिवाय पीक विम्यातील वगळलेले ट्रिगर पुन्हा लागू करावेत आणि



पेसा मोबिलायझर पदे कमी करण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

१२ जून रोजी पुणे येथे झालेल्या या भेटीत किसान सभेच्या शिष्टमंडळाने आपले आक्षेप कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासमोर मांडले. मागण्यांची दखल न घेतल्यास सुरू असलेले आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या प्रसंगी डॉ. अजित नवले, अजित अभ्यंकर, उमेश देशमुख, अमोल वाघमारे, अजय बुरांडे, उद्धव पौळ, दीपक लिपने, जितेंद्र चोपडे, माणिक अवघडे, ताराचंद विघे, गणेश दराडे, गुलाब मुलानी, राजू घोडे, कमल बांबळे, आमोद गरुड, सोमनाथ निर्मल, नवनाथ मोरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## आर्या सोबलेची अबुधाबीतील विद्यापीठात ४ कोटींच्या शिष्यवृत्तीसह निवड

**● पारनेर । वीरभूमी–**



ध्येय जर उत्तुंग असेल, तर यशाची शिखरे स्वतःहून नतमस्तक होतात, या उक्तीचा प्रत्यय सोबलेवाडी (ता. पारनेर) येथील प्रतिभावान कन्या आर्या अभिजीत सोबले हिने घडवून आणला आहे. संयुक्त अरब अमिरातीतील नामांकित 'मोहम्मद बिन झायेद युनिव्हर्सिटी ऑफ एआय', अबुधाबी येथे उच्च शिक्षणासाठी तिची निवड झाली असून, तिला तब्बल ४ कोटी रुपयांची शिष्यवृत्तीही जाहीर झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे सोबलेवाडीसह संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावला आहे. आर्याचे हे यश तिच्या अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीचे फलित मानले जात आहे. ग्रामीण भागातून येऊन जागतिक दर्जाच्या विद्यापीठात स्थान मिळवणे ही अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब आहे. तिच्या या यशामागे आई-वडील ऋतुजा आणि अभिजीत सोबले यांचे प्रोत्साहन व परिश्रम, तसेच मार्गदर्शक श्रेया आहेर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून आर्याने हे यश संपादन केले आहे. आर्याच्या या दैदिप्यमान कामगिरीबद्दल न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेरचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, प्रा. नवीनकुमार आहेर, मोहनराव रेपाळे आणि बाळासाहेब सोबले यांनी तिचे विशेष कौतुक करत अभिनंदन केले आहे.

# कर्जत येथील एकाच बारवेवर आढळले दोन दुर्मिळ शिलालेख

### 'सराफ विहीर' बांधकाम आणि 'चतुर्थी विहीर' जीर्णोद्धाराची ऐतिहासिक नोंद । सन १६९८ मधील करजतचा नामोल्लेख

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**



अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे एकाच बारवेवर कोरलेले दोन ऐतिहासिक शिलालेख आढळून आले असून, मराठा कालखंडातील जलव्यवस्थापन, दानपरंपरा आणि लोककल्याणकारी कार्यांची मौल्यवान माहिती या लेखांमधून समोर आली आहे. विशेष म्हणजे पहिल्या शिलालेखात सराफ विहीर बांधल्याची तर दुसऱ्या शिलालेखात चतुर्थी विहीर जीर्णोद्धाराची नोंद आढळते. सन १६९८ मध्ये करजत असा उल्लेख असलेला हा शिलालेख स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

हे दोन्ही शिलालेख कर्जत शहरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या कर्जत-शिंदेवाडी मार्गालगत उजव्या बाजूस असलेल्या चौकोनी बारवेवर आढळले आहेत. पहिला शिलालेख बारवेच्या आतील भिंतीवर उंचावर कोरलेला असून तो सात ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी भाषेतील आहे. अनेक वर्षे उघड्यावर असल्यामुळे लेखातील काही अक्षरे झिजली असून काही तुटलेली आहेत. मात्र छाप घेऊन अभ्यास केल्यानंतर त्यातील मजकूर वाचण्यात संशोधकांना यश आले.

शिलालेखाच्या वाचनानुसार शालिवाहन शक १६२०, बहुधान्य नाम संवत्सर म्हणजेच इ.स. १६९८ मध्ये गोविंद तुकदेव कीरपेकर यांची मुले हणमंत, रामाजी आणि तुकोजी यांनी सराफ विहिरीस रुपये १००६ खर्च केल्याची नोंद आहे. या उल्लेखावरून तत्कालीन काळातील सार्वजनिक जलस्रोत उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत दिली जात असल्याचे स्पष्ट होते. सराफ विहिरीस खर्च या उल्लेखावरून व्यापारी किंवा सराफ समाजाचा लोककल्याणातील सहभाग अधोरेखित होतो.

दुसरा शिलालेख बारवेच्या पायऱ्यांजवळील दगडी चौथऱ्यावर दोन स्वतंत्र शिळांवर कोरलेला आहे. त्यामध्ये शालिवाहन शक १६२२, विक्रम नाम संवत्सर, अंगारकी चतुर्थी अर्थात ३ डिसेंबर १७०० रोजी गोविंद तुकदेव कीरपेकर यांचे पुत्र धर्माजी यांनी चतुर्थी विहीर जीर्णोद्धार केल्याची नोंद आहे. या लेखात भगवंत राम आणि नरसो नागनाथ यांचा उल्लेख असून ते या कामातील कारागीर असावेत, असा संशोधकांचा अंदाज आहे.

या दोन्ही शिलालेखांमधून तत्कालीन समाजातील जलसंवर्धनाची जाणीव, सार्वजनिक वास्तूंचे जतन आणि दानपरंपरेचे महत्त्व अधोरेखित होते. विहिरी या त्या काळातील ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू होत्या. पिण्याचे पाणी, शेती, प्रवासी आणि जनावरांच्या गरजा भागविण्यासाठी अशा जलस्रोतांचे मोठे महत्त्व होते. त्यामुळे विहिरी बांधणे किंवा त्यांचा जीर्णोद्धार करणे हे अत्यंत पुण्यकर्म मानले जात असे.

इतिहास संशोधकांच्या मते, मराठा कालखंडात देवळे, विहिरी, तळी आणि धर्मशाळा यांसारख्या सार्वजनिक उपयुक्ततेच्या वास्तू उभारण्याची परंपरा दृढ होती. कर्जत येथील हे दोन्ही शिलालेख त्या परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जात असून, ते तत्कालीन महाराष्ट्रातील सामाजिक जबाबदारी, आर्थिक समृद्धी आणि जलव्यवस्थापनाच्या जाणिवेचे जिवंत दस्तऐवज ठरत आहेत.

या शिलालेखांचे संशोधन राजेश पोपट इंगळे यांनी केले असून वाचन अनिल किसन दुधाणे आणि डॉ. शैलेंद्र भांडारे यांनी केले आहे. तसेच शोधकार्य आणि छाप घेण्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे, शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे दिगंबर भुजबळ आणि सचिन भोसले यांचे सहकार्य लाभले.

## सिंहस्थ कुंभमेळा ठरणार जागतिक अध्यात्मिक, सांस्कृतिक पर्यटन स्थळ

**● शिर्डी । वीरभूमी–**



नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर भाविक व पर्यटकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासह सिंहस्थ कुंभमेळ्याला जागतिक आध्यात्मिक व सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने शिर्डी येथे आज पर्यटनविषयक तयारीचा आढावा घेण्यात आला.

केंद्रीय पर्यटन मंत्रालयाचे सचिव भुवनेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत कुंभमेळ्याच्या अनुषंगाने पर्यटन पायाभूत सुविधा, भाविकांसाठी सुविधा, सांस्कृतिक उपक्रम, ब्रँडिंग आणि देश-विदेशात प्रसिद्धी यासंदर्भातील नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या तयारीच्या सद्यस्थितीचे सादरीकरण केले. यामध्ये सुरू असलेले नियोजन, प्रस्तावित पायाभूत सुविधा, विविध विभागांमधील समन्वय आणि कुंभमेळ्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.

नाशिक विभागीय आयुक्त तथा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम हे बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. शिर्डी येथील बैठकीस श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, एमटीडीसीचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसी नाशिकचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, पर्यटन संचालनालय नाशिकचे उपसंचालक नंदकुमार राऊत, श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे आदी उपस्थित होते.

सिंहस्थ काळात येणाऱ्या भाविक व पर्यटकांसाठी टेंट सिटी, सांस्कृतिक केंद्रे, इंटरप्रिटेशन सेंटर, डिजिटल अनुभव केंद्रे आणि प्रदर्शन सुविधा विकसित करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, पारंपरिक कला आणि स्थानिक कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी कलाग्राम/कल्चरल हाट उभारणीवर विशेष भर देण्यात आला.

पर्यटक सुविधा केंद्रे, डिजिटल सेवा, बहुभाषिक मदत व्यवस्था व भाविकांसाठी आवश्यक सुविधांच्या नियोजनाचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

'इन्क्रेडिबल इंडिया' अंतर्गत सिंहस्थ कुंभमेळ्याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी, पर्यटन सर्किट, विविध पर्यटन स्थळांमधील कनेक्टिव्हिटी तसेच हेली-टुरिझमसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांवरही चर्चा करण्यात आली. पर्यटन क्षेत्राशी संबंधित घटकांचे प्रशिक्षण, क्षमता वृद्धी आणि मागील कुंभमेळ्यांमधील यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतही बैठकीत विचारविनिमय करण्यात आला.

केंद्रीय पर्यटन मंत्रालय, महाराष्ट्र शासन, एमटीडीसी, पर्यटन संचालनालय आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण यांच्या समन्वयातून सिंहस्थ कुंभमेळा २०२७ भाविकांसाठी सुरक्षित, सुलभ व अविस्मरणीय करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे.

## कोतुळमध्ये पोलिसांचा छापा; १.३९ लाखांचा गुटखा व आठ घरगुती गॅस सिलेंडर जप्त

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले पोलिस निरीक्षक मोहन बोरसे आणि त्यांच्या पथकाने कोतुळ येथे छापा टाकून १ लाख ३९ हजार ४६४ रुपयांचा पान मसाला व सुगंधी तंबाखू (गुटखा) तसेच आठ घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरच्या टाक्या जप्त केल्या. मात्र, या कारवाईदरम्यान गुटखा विक्रेता पोलिसांच्या हाती लागला नाही.

अकोले तालुक्यातील कोतुळ परिसरात मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळत होती. आज सकाळी गुप्त माहितीदाराकडून कोतुळ गावातील एका गल्लीत मच्छिंद्र देशमुख यांच्या घराशेजारील एका गाळ्यात गुटखा विक्रीसाठीचा साठा ठेवण्यात आल्याची माहिती अकोले पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार स्वतःसह तीन पथके तयार करून कोतुळ येथे छापेमारी केली. संबंधित गाळ्यातून डायरेक्टर, रॉयल पान मसाला आणि सुगंधी तंबाखू असा एकूण १ लाख ३९ हजार ४६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय, आठ घरगुती गॅस सिलेंडरच्या टाक्याही पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आल्या.

सदर गाळ्याच्या मालकाकडे चौकशी केली असता, हा गाळा समीर काझी या व्यक्तीला भाडेतत्त्वावर दिला असल्याचे सांगण्यात आले. तसेच, समीर काझी हा गुटखा विक्रीचा व्यवसाय करत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी तात्काळ त्याचा शोध घेतला असता तो फरार झाल्याचे समजले.

दरम्यान, अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार हे अकोले येथे दाखल झाले असून त्यांनी पोलिस ठाण्यात जप्त करण्यात आलेल्या मालाची पाहणी केली. रात्री उशिरापर्यंत संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# महिला आर्थिक विकास महामंडळाची वार्षिक क्रेडिट प्लान कार्यशाळा संपन्न

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालयाच्या वतीने आयोजित वार्षिक क्रेडिट प्लान २०२६-२७ कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय सल्लागार शैलेश पाटील आणि विभागीय उपजीविका सल्लागार नवनाथ नाईक यांच्या हस्ते हॉटेल अमर पॅलेस येथे संपन्न झाले.

कार्यशाळेस आयसीआयसीआय बँकेचे विभागीय व्यवस्थापक वैभव भाटिया, युनियन बँकेचे मुख्य व्यवस्थापक संदीप महांदुळे, एचडीएफसी बँकेचे इंद्रजित चव्हाण, तौफिक देशमुख, बँक ऑफ महाराष्ट्रचे एस. ए. सावंत, खादी ग्रामोद्योगचे खलील हवालदार, जिल्हा उद्योग केंद्राचे निरीक्षक मनोज कुमार, बँक ऑफ बडोदाचे नितीन जाधव, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शैलेश पाटील आणि नवनाथ नाईक यांनी महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बँकांनी अधिक सहकार्य करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच, जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या विविध उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते यांनी माविमच्या जिल्ह्यातील कामकाजाची माहिती दिली. नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील २४७ गावांमध्ये काम सुरू असून, आतापर्यंत २ हजार ७४४ स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे. या बचत गटांमध्ये सुमारे २७ हजारांहून अधिक ग्रामीण महिला सहभागी झाल्या आहेत.

आतापर्यंत सुमारे २,००२ बचत गटांनी विविध बँकांकडून एकूण ३२४ कोटी ६ लाख रुपयांचे बँक कर्ज घेतले असून, कर्ज परतफेडीचे प्रमाण ९८.५ टक्के आहे. बचत गटांनी बँक व अंतर्गत कर्ज तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन विविध उद्योग-व्यवसाय सुरू केले असून, त्यामुळे सुमारे २१ हजारांहून अधिक महिला स्वावलंबी बनल्या आहेत.

माविममार्फत जिल्ह्यात ८ लोकसंचालित साधन केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी यशस्वीपणे कार्यरत आहेत. महिलांना संघटित करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात १११ सूक्ष्म प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.



कार्यशाळेत राज्यस्तरीय नवतेजस्विनी प्रकल्पाचे सादरीकरण विभागीय सल्लागार शैलेश पाटील यांनी केले, तर सूक्ष्म कर्जविषयक सादरीकरण विभागीय उपजीविका सल्लागार नवनाथ नाईक यांनी केले. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा जिल्हास्तरीय क्रेडिट प्लान उमेश कहाते यांनी सादर केला.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन नेहा परदेशी यांनी केले, तर आभारप्रदर्शन उपजीविका विकास अधिकारी प्रशांत पाटील यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी लेखाधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार दीपक माने, एमआयएस सल्लागार योगेश कदम आणि लिपिक मच्छिंद्र कुऱ्हे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये 'पोलीस दीदी आणि काका' उपक्रम राबविण्याची मागणी

## विद्यार्थी सुरक्षा, बाल संरक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठी पोलीस, शिक्षण विभाग व स्नेहालय संस्थेचा संयुक्त पुढाकार

**● अहिल्यानगर । वीरभूमी-** अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये 'पोलीस दीदी आणि काका' उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा, तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि शाळा वाहन चालकांसाठी नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत, या मागणीचे सविस्तर निवेदन स्नेहालय संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आले.

स्नेहालय संस्था गेल्या ३८ वर्षांपासून महिला, बालक, किशोरवयीन मुलामुली आणि वंचित घटकांच्या संरक्षण, सक्षमीकरण, शिक्षण, पुनर्वसन आणि हक्क संरक्षणासाठी कार्यरत आहे. बालविवाह प्रतिबंध, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध, बाल संरक्षण, समुपदेशन आणि संकटग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी संस्थेचे विविध प्रकल्प सातत्याने कार्यरत आहेत.

नुकतीच अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, भरोसा सेल आणि स्नेहालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील पोलीस दीदी आणि संबंधित अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत बाल संरक्षण, मुलामुलींची मानसिकता, संवेदनशील हस्तक्षेप, कायदेशीर जबाबदाऱ्या, संवाद कौशल्य आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेत जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी पोपट धामणे, स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे, ॲड. श्याम आसावा, डॉ. प्राजक्ता कुलकर्णी, डॉ. विनय कोपरकर आणि डॉ. तेजस्विनी मिस्कीन यांच्यासह विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले होते. विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी पोलीस, शिक्षण विभाग आणि सामाजिक संस्थांमध्ये अधिक समन्वयाची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली.

या कार्यशाळेच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनात जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत 'पोलीस दीदी' माहिती फलक लावणे, विद्यार्थी-पालक-शिक्षक संवाद कार्यक्रम आयोजित करणे, शाळा वाहन चालक आणि वाहतूक कर्मचाऱ्यांसाठी विशेष सुरक्षा सत्रे घेणे, तसेच सायबर सुरक्षा, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध, सुरक्षित स्पर्श-असुरक्षित स्पर्श, बालविवाह प्रतिबंध, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, महिला सुरक्षा आणि विद्यार्थ्यांचे कायदेशीर हक्क या विषयांवर नियमित मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदन स्वीकारताना शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी 'पोलीस दीदी आणि काका' उपक्रम अत्यंत उपयुक्त असल्याचे नमूद केले. स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी आणि डॉ. प्राजक्ता कुलकर्णी तसेच अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या पुढाकारातून जिल्ह्यात 'पोलीस दीदी' संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, मुलींवरील अत्याचार व छेडछाडीच्या



घटना रोखणे, सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता वाढविणे आणि विद्यार्थ्यांशी विश्वासाचे नाते निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

स्नेहालय संस्थेच्या वतीने जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, पालक गट, ग्रामस्तरीय समित्या आणि इतर सामाजिक घटकांसोबत बाल संरक्षण, पोलीस दीदी, बालविवाह प्रतिबंध, सायबर सुरक्षा, महिला सुरक्षा आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध या विषयांवर जनजागृती कार्यक्रम राबविण्यास संपूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शविण्यात आली आहे.

हे निवेदन ॲड. श्याम आसावा, संतोष धर्माधिकारी (प्रकल्प समन्वयक, स्नेह बाल आधार), विकास सुतार (प्रकल्प समन्वयक, युवा निर्माण प्रकल्प), विद्या घोरपडे (प्रकल्प समन्वयक, स्नेहधार प्रकल्प) आणि प्रविण कदम (प्रकल्प व्यवस्थापक, उडान प्रकल्प) यांनी सादर केले.

यावेळी 'प्रत्येक शाळेत पोलीस दीदी, प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षिततेची हमी आणि प्रत्येक पालकाला विश्वास' हे उद्दिष्ट समोर ठेवून जिल्हास्तरावर व्यापक जनजागृती अभियान राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

# जीपीआर प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे ऑफलाइन पर्यायी व्यवस्था द्या; ग्राहक पंचायतची मागणी

**● अकोले । वीरभूमी-** अकोले आदिवासी तालुक्यात शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलवर लागू करण्यात आलेल्या नव्या जीपीआर (गव्हर्नमेंट प्रोसेस री-इंजिनिअरिंग) प्रणालीमुळे सेतू केंद्रे व महा ई-सेवा केंद्रांमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असून, सॉफ्टवेअर सुरळीत होईपर्यंत ऑफलाइन दाखल्यांना मान्यता देण्यात यावी, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात अकोलेचे तहसीलदार डॉ. सिद्धार्थकुमार मोरे यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर आणि कार्याध्यक्ष महेश नवले यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, अकोले हा अहिल्यानगर जिल्ह्यातील आदिवासी व अतिदुर्गम तालुका असून भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण आहे. अनेक गरीब विद्यार्थी पायपीट करून शिक्षण घेत आहेत. अशा परिस्थितीत 'महा ऑनलाइन'चे सॉफ्टवेअर वारंवार बंद पडत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सॉफ्टवेअरमधील त्रुटी दूर होईपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून ऑफलाइन दाखल्यांना मान्यता देण्यात यावी.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, सर्व्हर डाऊन होणे, लॉगिन न होणे तसेच आवश्यक कागदपत्रे अपलोड न होणे अशा तांत्रिक अडचणी सातत्याने उद्भवत आहेत. परिणामी, सन २०२६ मध्ये शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अकरावी तसेच पदवी व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक दाखले वेळेत मिळत नसल्याने प्रवेश नाकारला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी भरती तसेच विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक असलेले अधिवास, राष्ट्रीयत्व आणि इतर दाखले वेळेत मिळत नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय, दाखल्यांच्या पडताळणीची प्रक्रिया अधिक कठोर करण्यात आल्यामुळेही विलंब होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दाखले उपलब्ध न झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली असून, त्यामुळे ते मानसिक तणावाखाली असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

या सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अन्यथा पालक व विद्यार्थी पूर्वसूचना न देता आंदोलन, उपोषण, रास्ता रोको आदी मार्गांचा अवलंब करतील, असा इशारा ग्राहक पंचायतच्या वतीने देण्यात आला आहे.

या निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, तालुका कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, प्रा. डॉ. सुनील शिंदे, सचिव राम रुद्रे, रामदास पांडे, भाऊसाहेब वाकचौरे, कैलास तळेकर, अनंत घाणे, सुरेश गबाले, गंगाराम धिंदळे, मोहन मुंडे, गणपत थिगळे, रामदास पवार, अशोक उघडे, प्रमोद मंडलिक, रामहरी तिकांडे, बाळासाहेब बनकर, सखाराम खतोडे, दत्ता ताजणे, ज्ञानेश्वर पुंडे, जालिंदर बोडके, भाऊसाहेब गोरडे, माधवराव तिटमे, प्रकाश कोरडे, राजेंद्र लहामगे आदींची स्वाक्षरी आहे.

या निवेदनाच्या प्रती माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी (मुख्यमंत्री सचिवालय कक्ष), तसेच अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांना पत्र व ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# खाजगी शाळांकडून पालकांची आर्थिक लूट; शिक्षण विभागाच्या दिरंगाईविरुद्ध उपोषणाचा इशारा

## 'भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश' संघटना आक्रमक

**● पारनेर । वीरभूमी-** पारनेर तालुक्यातील काही खाजगी शाळांमध्ये शालेय साहित्य आणि गणवेशाची सक्तीने तसेच चढ्या दराने विक्री करून पालकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या मनमानी कारभाराविरोधात 'भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश' संघटनेने आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाच्या दिरंगाईचा निषेध नोंदवित १५ जून २०२६ पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

यासंदर्भात संघटनेचे जिल्हा संघटक भानुदास पांडुरंग साळवे यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खाजगी शाळांचे व्यवस्थापन प्रशासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून शैक्षणिक साहित्याच्या खरेदीसाठी पालकांना वेठीस धरत आहे. शालेय गणवेश आणि इतर आवश्यक वस्तू शाळेतूनच विकत घेण्याची सक्ती केली जात असल्यामुळे पालकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

या गंभीर विषयाकडे वारंवार लक्ष वेधूनही आणि अनेक तक्रारी करूनही शिक्षण विभागाकडून ठोस कारवाई करण्याऐवजी केवळ उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या या दुर्लक्षामुळे संबंधित शाळांचे धाडस वाढले असून, पालकांची आर्थिक लूट आजही सुरूच असल्याचे साळवे यांनी म्हटले आहे.

वरिष्ठ स्तरावरून सूचना देऊनही कारवाई होत नसल्याने शिक्षण विभाग स्वतःच्या कर्तव्यात कसूर करत असल्याचा थेट आरोपही त्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर १५ जून २०२६ पर्यंत या प्रकारावर कायमस्वरूपी बंदी घालून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा पीडित विद्यार्थी आणि पालकांना सोबत घेऊन तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस प्रशासन पूर्णपणे जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने हस्तक्षेप करावा आणि चुकीच्या प्रथांना पाठीशी घालू नये, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

या निवेदनाच्या प्रती शिक्षणाधिकारी (जिल्हा परिषद, अहिल्यानगर), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, पालकमंत्री, स्थानिक आमदार तसेच पोलीस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. आता या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे तालुक्यातील पालकांचे लक्ष लागले आहे.

# शेत - पाणंद रस्त्यांमध्ये अडथळे आणणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा

## पाच वर्षे शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याची शक्यता । श्रीगोंद्यात शेतरस्ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन-चळवळ समन्वय मॉडेल

**● श्रीगोंदा । वीरभूमी-** मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना अंतर्गत खुले करण्यात आलेल्या शेतरस्त्यांमध्ये पुन्हा अडथळे निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, संबंधितांना पाच वर्षांपर्यंत विविध शासकीय योजनांच्या लाभांपासून वंचित ठेवण्याचा इशारा आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी दिला आहे.

तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी विनीत शिर्के, तहसीलदार सचिन डोंगरे, प्रभारी गटविकास अधिकारी प्रतीक काळेबाघ, मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत व शिव - पाणंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले आदी उपस्थित होते.

आमदार पाचपुते म्हणाले की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १४३ तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम ५ अंतर्गत शासनाने शेत - पाणंद रस्ते कायमस्वरूपी खुले राहावेत यासाठी कठोर तरतुदी लागू केल्या आहेत. खुले करण्यात आलेल्या रस्त्यांची निशाणी काढून टाकणे, रस्ता बुजविणे किंवा स्वतःच्या क्षेत्रात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे हा गंभीर कायद्याचा भंग मानला जाणार आहे.

अशा प्रकरणांमध्ये संबंधित शेतकऱ्यांचे आधार कार्ड व ग्री-स्टॅक नोंदणी पाच वर्षांसाठी निलंबित करण्याची तसेच विविध शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याची कारवाई होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना कायद्याच्या तरतुदींची



माहिती व्हावी आणि भविष्यात कोणत्याही प्रकारचे वाद निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अनेकदा कायद्याची माहिती नसल्याने चुका घडतात. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी सहकार्य करून शेतरस्ते कायम खुले ठेवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

श्रीगोंदा तालुक्यात आतापर्यंत सुमारे ५४ किलोमीटर शेत- पाणंद रस्ते सामंजस्याने आणि संबंधित समित्यांच्या सहकार्याने खुले करण्यात आले आहेत. सर्व शेतकऱ्यांनी असेच सहकार्य कायम ठेवल्यास उर्वरित रस्तेही लवकर खुले होतील आणि श्रीगोंदा तालुका राज्यात आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या कार्याची दखल घेत क्षेत्रीय समितीमध्ये पाच सदस्यांपैकी चार सदस्यांची निवड चळवळीमधून करण्यात आल्याने या निर्णयाची राज्यभर चर्चा सुरू झाली आहे. यात राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांची निवड करण्यात आली आहे.

निस्वार्थ, पारदर्शक आणि राजकारणविरहित पद्धतीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कार्याला शासनमान्यता मिळाल्याची भावना चळवळीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी सांगितले की, शेतरस्त्यांचा प्रश्न हा केवळ रस्त्यांचा नसून शेती, उत्पादन, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. चळवळीच्या माध्यमातून महसूल, भूमी अभिलेख, पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी यांच्यात समन्वय निर्माण करून अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात यश आले आहे.

आतापर्यंत सुमारे ४० रस्त्यांचे सीमांकन करून ते खुले करण्यात आले असून, संबंधित रस्त्यांना तातडीने निधी उपलब्ध करून मजबुतीकरण करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. सीमांकन झालेल्या रस्त्यांना सांकेतिक क्रमांक देऊन शासकीय फलक लावणे, भूमी अभिलेख विभागामार्फत सिमेंट पोल उभारणे तसेच अतिक्रमण करून सीमांकनाचे नंबर उपटणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.